www.maharashtratimes.com

मुंबईचे नं.१ मराठी वृत्तपत्र

# महाराष्ट्र टाइम्स

मुंबई। मंगळवार, ५ एप्रिल २०१६ ◆ पाने १२ + मुंबई टाइम्स ◆ शहर आवृत्ती ** ◆ ₹ ४.०० किंवा ७.०० द टाइम्स ऑफ इंडियासहित

| सोने | चांदी |
|---|---|
| २८,९५५ | ३५,९७० |
| **सेन्सेक्स** | **निफ्टी** |
| २५,३९९.६५ | ७,७५८.८० |
| **डॉलर** | **युरो** |
| ६६.२४ ₹ | ७५.३७ ₹ |



स्टोक्स उद्ध्वस्त झालाय... ◀ p11




मला आवडतं 35 सुखसोयींचा लाभ घ्यायला 6.99%* एवढ्या कमी व्याजदरावर.

पहिल्या 200 बुकिंग्ज जिंकण्यास पात्र. गुढीपाडवा, 8 एप्रिल 2016 पासून बुकिंग सुरू.

भूमिपूजन 8 एप्रिल रोजी सकाळी 10 वाजता.
साईटचा पत्ता : वननेस, न्यू लिंक रोड, साई ली हॉस्पिटल पुढे, डॉन बॉस्को सिग्नल जवळ, बोरीवली (पश्चिम), मुंबई 92

To know more, Call +91 82681 51465, SMS "ONENESS" to 56677 or Log on to onenesshomes.com

DHEERAJ

ONENESS
My Borivali (W)

All images are for representative purposes only. *Conditions apply.


महाराष्ट्र टाइम्स

## CITIZEN REPORTER



**वाचकहो, MT Citizen Reporter हे अॅप गुगल प्ले स्टोअरवरून डाऊनलोड करा. या अॅपवरून 'मटा'कडे समस्या, प्रश्न, बातम्या, फोटो पाठवण्यास मोठ्या प्रमाणावर सुरुवात झाली आहे. तुम्हाला भेडसावणाऱ्या समस्या, तुम्हाला 'दिसणाऱ्या' बातम्या, सार्वजनिक हिताची छायाचित्रे मांडू शकता 'महाराष्ट्र टाइम्स'च्या या व्यासपीठावर...**

►► पान...२

# ५०० भारतीय गोत्यात!

## बडे नेते, सेलिब्रिटी, उद्योगपतींनी गुंतवला काळा पैसा

**वृत्तसंस्था,** नवी दिल्ली

संपूर्ण जगाला हादरवून टाकणारे आजवरचे सर्वांत मोठे 'पनामा पेपर्स' प्रकरण रविवारी उघड झाले. जगभरातील बडे नेते, सेलिब्रिटी, खेळाडू यांची नावे या यादीत असून अब्जावधी रुपये मध्य अमेरिकेतील पनामा देशातील मोझॅक फोन्सेका या विधी कंपनीमध्ये दडवून कोट्यवधींचा कर चुकवल्याचे त्यातून स्पष्ट झाले. यात तब्बल ५०० नामवंत भारतीय असल्यामुळे केंद्र सरकारने तातडीने हालचाल करत या प्रकरणाची चौकशी एकाचवेळी अनेक तपास यंत्रणा करतील, असे सोमवारी जाहीर केले. यासाठी तातडीने मल्टि-एजन्सी तपासगटाची स्थापना करण्यात आली आहे.



'पनामा पेपर्स प्रकरणाविषयी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्याशी आपली चर्चा झाली असून त्यानुसार हा तपास गट स्थापन करण्यात आल्याची माहिती केंद्रीय अर्थमंत्री अरुण जेटली यांनी दिली. इंटरनॅशनल कन्सॉर्शियम ऑफ इन्व्हेस्टिगेटिव्ह जर्नालिस्ट (आयसीआयजे) या गटाने पनामा पेपर्सची ही माहिती रविवारी उघड केली. सुमारे ५०० नामांकित भारतीयांनी आपला पैसा पनामा देशातील मोझरक फोन्सेका या कायदेविषयक कंपनीत दडवला असल्याचे यातून उघड झाले आहे.

यापैकी अनेकांचे कुटुंबीय अनिवासी भारतीय आहेत. त्यामुळे ते परदेशी गुंतवणुकीसाठी भारतीय कायद्याच्या कक्षेत येत नाहीत. यामुळे या लोकांची चौकशी करताना अडचणी येणार आहेत. एएफपी या वृत्तसंस्थेच्या अहवालानुसार पनामा पेपर्स प्रकरणाची ११.५ दशलक्ष कागदपत्रे उघड झाली असून यात आंतरराष्ट्रीय दर्जाच्या १४० राजकारण्यांची नावे गुंतलेली आहेत. रशियाचे अध्यक्ष व्लादिमीर पुतिन, फुटबॉल स्टार लिओनल मेस्सी यांच्यासारखे दिग्गजही यात गुंतलेले आहेत, असा दावा एएफपीने केला आहे.

पनामा पेपर्ससंदर्भातील मिळालेल्या नोंदणी या गेल्या ४० वर्षांतील आहेत. याचा अर्थ बेकायदा मार्गाने पैसा पनामामध्ये दडवण्याचा प्रकार गेल्या ४० वर्षांपासून सुरू असल्याचा दावा एका जर्मन दैनिकाने केला आहे. याच दैनिकाने सर्वप्रथम ही कागदपत्रे मिळवली होती. त्यानंतर ही माहिती आयसीआयजेने जाहीर केली. असा प्रकारे माहिती उघड होणे हे स्वागतार्ह असल्याचे जेटली यांनी म्हटले आहे.

►► अधिक वृत्त...१०

**'पनामा' लीक्स**

### ही भारतीय नावे

अमिताभ बच्चन, ऐश्वर्या राय-बच्चन, डीएलएफ कंपनीचे मालक के.पी. सिंग आणि त्यांच्या कुटुंबातील नऊ सदस्य, अपोलो टायर्स व इंडिया बुल्सचे प्रमोटर्स, अदानी ग्रुपचे विनोद अदानी यांच्यासह सेलिब्रिटी, उद्योगपतींचा यादीत समावेश आहे.



## ४७ पोलिसांना जन्मठेपेची शिक्षा

**वृत्तसंस्था,** लखनऊ

पोलिसी अत्याचाराचा निर्घृण चेहरा ठरलेल्या पिलिभीत खोट्या चकमक प्रकरणात अखेर २५ वर्षांनंतर न्याय झाला आहे. सरकारी पुरस्कार व रोख बक्षिसांच्या हव्यासापोटी १० निष्पाप शीख भाविकांना दहशतवादी ठरवून त्यांची थंड डोक्याने हत्या करणाऱ्या उत्तर प्रदेशच्या तब्बल ४७ पोलिसांना सीबीआय कोर्टाने सोमवारी जन्मठेप सुनावली.

उत्तर प्रदेशच्या तेराई भागात खलिस्तानवादी दहशतवादाचे चटके झेलणाऱ्या पोलिसांनी १२ जुलै, १९९१ रोजी पिलिभीतकडे जाणारी एक लक्झरी बस अडवून त्यातील पुरुष भाविकांना ताब्यात घेतले. दोन दिवस-रात्र त्यांची चौकशी करून यातील १० जणांना जंगलात नेऊन त्यांची गोळ्या झाडून हत्या केली. त्यानंतर या सर्वांना खलिस्तानवादी ठरवून त्यांच्याकडून शस्त्रेही जप्त केल्याचा बनाव रचण्यात आला. या सर्वांवर त्याच दिवशी पोलिसांनीच अंत्यसंस्कार केले. मात्र या चकमकीवर प्रश्नचिन्ह उठल्याने सुप्रीम कोर्टाच्या आदेशानंतर सीबीआय चौकशी नेमण्यात आली व त्यातून हा रक्तरंजित कट उघडकीस आला. याप्रकरणी ५७ पोलिसांवर खटला चालला, पण खटल्यादरम्यान १० जणांचा मृत्यू झाला.

# राहुल देशपांडेसोबत आज 'मटा संवाद'

**म. टा. प्रतिनिधी,** मुंबई



इंग्रजी आणि हिंदी गाण्यांकडून पुन्हा एकदा केवळ आवाजातील नजाकतीच्या बळावर तरुणाईला शास्त्रीय संगीताचा नाद लावणारा आवाज, दुर्लक्षित होत असलेल्या संगीत नाटकांना पुन्हा उभारी देण्यासाठी आपल्या आवाजाची जादू संगीतप्रेमींमध्ये पेरणारा, तरुणाईचा आयकॉन बनलेला गायक, डॉ. वसंतराव देशपांडे यांची परंपरा पुढे नेणारा... राहुल देशपांडे या गायकाची अशी विविध पद्धतीने ओळख करून देता येते. राहुल देशपांडेला यंदा महाराष्ट्र टाइम्सचा युथ आयकॉन पुरस्कार देऊन गौरवण्यात आले. या युथ आयकॉन राहुल देशपांडेशी थेट गप्पा मारण्याची संधी आज संगीतप्रेमींना मटा संवादच्या माध्यमातून उपलब्ध होणार आहे.

'कट्यार काळजात घुसली' या संगीत नाटकाच्या माध्यमातून आणि आता यावर आधारित चित्रपटाच्या माध्यमातून राहुल देशपांडे हे नाव मराठी घराघरांत पोहोचले. मात्र या लोकप्रियतेपर्यंतचा त्याचा प्रवास कसा होता? त्याने त्यासाठी किती मेहनत घेतली आहे? त्याच्या गुरूंनी त्याला दिलेले ज्ञान, केलेली उपासना, या प्रवासातील त्याची प्रयोगात्मकता आणि जमिनीवर पाय घट्ट रोवून मोठे क्षितिज कवेत घेण्याची त्याची इच्छा अशा विविध विषयांवर मटा संवादच्या माध्यमातून त्याला बोलते करण्यात येणार आहे. आज, मंगळवारी ५ एप्रिल रोजी महाराष्ट्र टाइम्स आणि लोकमान्य सेवा संघ, पार्ले यांच्या संयुक्त विद्यमाने गप्पांचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला आहे. **प्रथम येणाऱ्यास प्राधान्य या तत्त्वावर प्रवेश दिला जाईल.**

**मटा संवाद**

कुठे
**लोकमान्य सेवा संघ, विलेपार्ले पूर्व**

कधी
**आज, मंगळवार ५ एप्रिल**

वेळ
**सायं. ७.३०**

**सगळ्यांना आग्रहाचे आमंत्रण!**

## फास्ट न्यूज

### पश्चिम बंगालमध्ये ८०, आसामध्ये ७०% मतदान



**नवी दिल्ली :** पश्चिम बंगाल आणि आसाम राज्यांत विधानसभा निवडणुकांअंतर्गत पहिल्या टप्प्यात सोमवारी अनुक्रमे ८० व ७० टक्के मतदान झाले. प. बंगालमध्ये २९४ मतदारसंघांपैकी १८, तर आसाममध्ये १२६ पैकी ६५ मतदारसंघांमध्ये मतदान झाले. मतदानादरम्यान दोन्ही राज्यांत कोणतीही अनुचित घटना घडली नसल्याचे निवडणूक आयोगाने म्हटले आहे. मतदानाचा दुसरा टप्पा ११ एप्रिलला पार पडणार आहे.

### २३ एप्रिलला कन्हैया मुंबईत?



**मुंबई :** दिल्लीच्या जवाहरलाल नेहरू विद्यापीठातील विद्यार्थी संघटनेचा अध्यक्ष कन्हैया कुमार २३ एप्रिल रोजी मुंबईत येण्याचे जवळपास निश्चित आहे. तसेच पुण्यातही कन्हैयाचा कार्यक्रम आयोजित होणार असून, त्यासाठी २२ किंवा २४ एप्रिल यापैकी एक तारीख निवडण्यात येणार आहे. डाव्या संघटनांनी यासाठी कार्यक्रमस्थळ शोधण्यास सुरुवात केली आहे. मात्र कोणताही अनुचित प्रकार घडल्यास त्याची जबाबदारी आयोजकांचीच राहील, असा इशारा पोलिसांनी दिला आहे.

### पेट्रोल-डिझेल दरवाढ

**नवी दिल्ली :** आंतरराष्ट्रीय उत्पादन आणि डॉलर-रुपयातील तफावतीमुळे इंडियन ऑइलने सोमवारी पेट्रोल दरात २ रु. १९ पैशांनी तर डिझेल दरात ९८ पैशांनी वाढ केली. पेट्रोल दरातील ही सलग दुसरी व डिझेलमधील सलग चौथी दरवाढ आहे. सध्या मुंबईत पेट्रोलचा दर ६५ रु. ७९ पैसे तर डिझेलचा दर ५५ रु. ६ पैसे आहे.

### पाणीटाक्यांजवळ जमावबंदी

**औरंगाबाद :** परभणीत जिल्हाधिकाऱ्यांनी पाण्याच्या टाक्यांजवळ ३ मेपर्यंत जमावबंदीचा आदेश सोमवारी लागू केला आहे. सध्या शहरात पिण्याच्या पाण्याची टंचाई गंभीर असून तब्बल १२ दिवसांनी शहरवासींना पाणी मिळत आहे. दादागिरी, धमकावून पाणी नेण्याचे प्रकार सुरू आहेत. त्यामुळे परिस्थिती नियंत्रणात आणण्यासाठी हे आदेश देण्यात आले आहेत. परभणीत तीन पाण्याच्या टाक्या आहेत.

►► वृत्त...१२

शैलेश जाधव







**अंशदायी पेन्शन योजना लागू करावी, जुनी पेन्शन योजना पुन्हा सुरू करावी तसेच केंद्रीय कर्मचाऱ्यांप्रमाणे सातवा वेतन आयोग लागू करावा यासारख्या विविध मागण्यांसाठी सोमवारी राज्य सरकारी कर्मचारी मध्यवर्ती संघटनेतर्फे आझाद मैदानात मोर्चा काढण्यात आला होता.**

►► वृत्त...३

# प्रदूषण नियंत्रण मंडळावर नामुष्की

jayant.howal
@timesgroup.com

**मटा विशेष**



**उल्हास नदी प्रदूषण प्रकरणात अधिकार काढले**

**मुंबई :** उल्हास नदीच्या पात्रात औद्योगिक कारखान्यांकडून होणारे प्रदूषण रोखण्यात काही कारवाईच झालेली नसून या प्रकरणाची दखल महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाकडून घेतली न गेल्यामुळे संतप्त झालेल्या राष्ट्रीय हरित लवादाने या प्रकरणात प्रदूषण मंडळाचे अधिकारच काढून घेतले आहेत. याचबरोबर केंद्रीय प्रदूषण नियंत्रण मंडळाने महाराष्ट्र प्रदूषण मंडळाला 'कारणे दाखवा' नोटीस बजावावी, असेही सांगितल्याने मंडळावर मोठी नामुष्की ओढावली आहे.

पर्यावरणाची बेसुमार हानी करून नामानिराळे राहणारे उद्योग आणि त्यांना हवी तशी मोकळीक देणाऱ्या पालिका आणि नगरपरिषदांना लवादाने वर्षभरापूर्वी चांगलाच दणका देत १०० कोटींचा खणखणीत दंड ठोठावला होता. ७ जुलै २०१५ रोजी लवादाने तसा आदेश दिला होता. त्याचबरोबर उल्हास नदीच्या पात्राशेजारील डोंबिवली ते अंबरनाथ पट्ट्यातील औद्योगिक कारखान्यांच्या सांडपाणी प्रक्रियेसाठी प्रक्रिया केंद्र उभारण्याचे निर्देशही दिले होते.

प्रदूषण रोखण्यासाठी राज्य प्रदूषण नियंत्रण मंडळाने तयार केलेला कृती आराखडा अमलात आणण्यासाठी थेट राष्ट्रीय मंडळाने देखरेख ठेवावी, असेही सांगितले होते. त्यानंतर सांडपाण्यावर उभारण्यात आलेला प्रकल्प हा निव्वळ धूळफेक आहे, अशी याचिका 'वनशक्ती' या पर्यावरणवादी संस्थेने केली होती.

►► अधिक वृत्त...६

# राष्ट्रीय क्रमवारीत मुंबई विद्यापीठ नाहीच!

**म. टा. प्रतिनिधी,** मुंबई

जागतिक क्रमवारीत आपले स्थान सुधारण्यासाठी अर्थसंकल्पात लाखो रुपयांची तरतूद करणाऱ्या मुंबई विद्यापीठाला केंद्रीय मनुष्यबळ विकास मंत्रालयाने जाहीर केलेल्या यादीत स्थानच मिळाले नसल्याची धक्कादायक माहिती हाती आली आहे. या यादीसाठी आवश्यक असणारी माहिती विद्यापीठाने मनुष्यबळ विकास मंत्रालयास पाठविलीच नसल्याने उघड झाले असून काही महिन्यांपूर्वी जागतिक स्तरावरील 'ब्रिक्स'च्या यादीतही मुंबई विद्यापीठाने माहिती न दिल्याने त्या यादीत विद्यापीठाला स्थान मिळविता आले नव्हते.

केंद्रीय मनुष्यबळ विकास मंत्रालयातर्फे सोमवारी राष्ट्रीय संस्थात्मक क्रमवारी प्रणाली (National Institutional Ranking Framework) जाहीर करण्यात आली. एकूण चार गटांत ही क्रमवारी असून यात विद्यापीठ पातळीसह इंजिनीअरिंग, फार्मसी आणि मॅनेजमेंट या चार विभागांचा समावेश आहे. मुंबईतील एकूण पाच संस्थांनी विविध गटांत आपली छाप सोडली असली तरी मुंबई विद्यापीठाने मात्र या यादीत निराशा केली आहे.



### या संस्था अग्रक्रमावर

**मुंबई :** आयआयटी मुंबईसह, आयसीटी मुंबई, बॉम्बे कॉलेज ऑफ फार्मसी कॉलेज आणि एस.पी. जैन मॅनेजमेंट इन्स्टिट्यूट

**राज्यातील सहा संस्था:** पुण्याच्या तीन, शिरपूरच्या दोन तर नागपूरच्या एका संस्थेचा समावेश.

### आयआयटी मद्रास अव्वल

देशातील शैक्षणिक संस्थांचे मूल्यमापण करणारी पहिलीच यादी केंद्र सरकारतर्फे सोमवारी जाहीर करण्यात आली. विशेष म्हणजे यात वादग्रस्त जवाहरलाल नेहरू विद्यापीठ (जेएनयू) व हैदराबाद विद्यापीठ अव्वल स्थानी आहेत. तंत्रज्ञानात आयआयटी मद्रासने प्रथम क्रमांक पटकावला आहे. आयआयटी मुंबईला यात दुसऱ्या स्थानावर समाधान मानावे लागले आहे.

►► अधिक वृत्त...९

## मेहबूबा काश्मीरच्या प्रथम महिला मुख्यमंत्री



**वृत्तसंस्था,** जम्मू

पीपल्स डेमोक्रॅटिक पार्टीच्या (पीडीपी) अध्यक्ष मेहबूबा मुफ्ती यांनी सोमवारी मुख्यमंत्रिपदाची शपथ घेत जम्मू-काश्मीरची सूत्रे हाती घेतली. राज्यपाल एन. एन. वोऱ्हा यांनी त्यांच्यासह २२ मंत्र्यांना पद व गोपनीयतेची शपथ दिली. मेहबुबा यांच्या रूपाने राज्याला पहिल्या महिला मुख्यमंत्री लाभल्या आहेत.

मुफ्ती मोहम्मद सईद यांच्या मृत्यूपश्चात राज्यात लागू करण्यात आलेल्या तीन महिन्यांच्या राष्ट्रपती राजवटीनंतर पीडीपी-भाजप युतीचे सरकार सत्तेत आले आहे. या पार्श्वभूमीवर ५६ वर्षीय मेहबूबा यांनी उर्दूमधून मुख्यमंत्रिपदाची शपथ घेतली.

►► अधिक वृत्त...१२



# मुख्यमंत्रिपदाची पर्वा नाही...

**म. टा. विशेष प्रतिनिधी,** मुंबई

**मुख्यमंत्र्यांचा संताप ; 'भारत माता की जय' वरून गोंधळ**

'भारत माता की जय हा कोणत्याही धर्माचा नारा नाही तर ती देशप्रेमाची घोषणा आहे. माझे मुख्यमंत्रीपद गेले काय किंवा राहिले काय, हे महत्त्वाचे नाही. पण मी सदैव 'भारत माता की जय' म्हणतच राहणार, अशी भूमिका मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सोमवारी विधानसभेत मांडली. मात्र 'भारत माता की जय' म्हणणार नसाल तर देश सोडून जा, असे वक्तव्य करणाऱ्या मुख्यमंत्र्यांनी महाराष्ट्राची दिलगिरी व्यक्त करावी, या भूमिकेवर ठाम राहत विरोधकांनी सभात्याग केला. तत्पूर्वी याच मुद्द्यावरून दोन वेळा सभागृहाचे कामकाज तहकूब करण्यात आले होते.

भारतमाता की जयघोषावरून मुख्यमंत्र्यांनी नाशिकमध्ये काढलेल्या उदगाराचे तीव्र पडसाद सोमवारी विधानसभेत उमटले. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे वक्तव्य आणि त्यानंतरचा खुलासा यावरून राज्यातील जनतेच्या मनात, विशेषत: एका समाजाच्या मनात संभ्रम आहे म्हणून मुख्यमंत्र्यांनी माफी मागावी, अशी मागणी विरोधी पक्ष नेते राधाकृष्ण विखे पाटील यांनी केली.

►► अधिक वृत्त...६

## पालिकेला साडेचार कोटींचा चुना

**म. टा. खास प्रतिनिधी,** मुंबई

महापालिकेने दक्षिण मुंबईतील ए विभागात प्रायोगिक तत्वावर राबविलेल्या पे अॅण्ड पार्कच्या कंत्राटात तीन कंत्राटदारांनी परवाना शुल्क व सेवाकरापोटी पालिकेला दिलेले तब्बल साडेचार कोटी रुपयांचे चेक न वटल्याचा धक्कादायक प्रकार उघडकीस आला आहे. या प्रकरणी कंत्राटदारांविरोधात एफआयआर दाखल करण्याचे तसेच पे अॅण्ड पार्कची जबाबदारी असलेल्या ज्युनिअर इंजनिअर मीलन मेहता यांची जबाबदारी निश्चित करण्यासाठी त्यांना निलंबित करून त्यांची चौकशी करण्याची शिफारस पालिकेच्या दक्षता विभागाने केली आहे.

पार्किंग कंत्राटात ठराविक कंत्राटदारांची मक्तेदारी चालत असल्याने मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी पालिकेच्या पार्किंग धोरणाला स्थगिती दिली आहे. दक्षिण मुंबईतील ए विभाग हा पार्किंगमध्ये सर्वाधिक महसूल देणारा भाग असल्याने पालिकेने येथील ४७पैकी ३६ पार्किंग स्पॉट टेंडर काढून प्रायोगिक तत्त्वावर चालविण्यास दिली आहेत. त्यातील मे. राज एंटरप्रायझेस, मे. कामेश क्रिएशन, व मे. ग्लोबल पॉवर सिस्टम्स या कंत्राटदारांनी परवाना शुल्क व सेवाकरापोटी पालिकेला चार कोटी ५९ लाख ४४७ रुपयांचे दिलेले १३ चेक बाऊन्स झाले. या प्रकरणी दक्षता विभाग व तांत्रिक लेखा चाचणी परिक्षकांनी (टावो) तपास केला असता कंत्राटदारांनी परवाना शुल्क भरल्याची पावतीद्वारे दाखविण्यात आले आहे. मात्र चेक न वटल्याचे पालिकेला चार ते पाच दिवसांनी समजले. कंत्राटदारांनी न वटणारे चेक देऊन पालिकेची फसवणूक केली आहे.

►► अधिक वृत्त...६

### हवामान

**सोमवारचे तापमान**

| | | |
|---|---|---|
| **कुलाबा** | : | कमाल ३१.८ अंश से. |
| | | किमान २५.२ अंश से. |
| **सांताक्रूझ** | : | कमाल ३२.९ अंश से. |
| | | किमान २३.६ अंश से. |

### आजचे अग्रलेख

**जुने भिडू, नवा डाव**

**जगज्जेते विंडीज**

### आजचा गणपती

**श्रीगणेश , दुगाड फाटा, कल्याण**

प्रेषक : किरण जोगळेकर। कल्याण

* मटा कॉम्बो ऑफर, मुंबई टाइम्स तसेच प्रॉपर्टी टाइम्स पुरवणी केवळ मुंबई, रायगड आणि ठाणे जिल्ह्यांतच देण्यात येईल.

**मटा अँकर** | **विंडीज बोर्डावर कर्णधार सॅमीची टीका; बोर्डाचेही प्रत्युत्तर**

# विंडीजच्या सेलिब्रेशनला नाराजीची किनार

**वृत्तसंस्था,** कोलकाता

**ईडन गार्डन्सवर वर्ल्ड टी-२० स्पर्धेची फायनल... इंग्लंडकडून जिगरबाज कामगिरीने खेचून आणत हक्काने पटकावलेले टी-२०चे जगज्जेतेपद... साहजिकच रविवारी वेस्ट इंडिज संघाच्या सेलिब्रेशनला उधाण आले होते. 'चॅम्पियन' गाण्यावर ठेका धरत यशाचे सेलिब्रेशन करणाऱ्या विंडीज संघाच्या खुषीत काही जणांना सडेतोड उत्तर दिल्याचा 'असूरी आनंद'ही होता. हे कुणी तरी म्हणजे वेस्ट इंडिज क्रिकेट बोर्ड आणि सातत्याने टीका करणारे स्थानिक पत्रकार...**



आपल्या घरच्या बोर्डावरील राग अन् टीकाकारांकडून होणाऱ्या अवहेलना याला आम्ही जगज्जेतेपद पटकावून उत्तर दिले आहे, अशी प्रत्येक विंडीज खेळाडूची देहबोली सांगत होती. मनातील ही सल सामन्यानंतर पार पडलेला बक्षीस समारंभ आणि पत्रकार संवाद यातून कोणताही आडपडदा न ठेवता व्यक्तही झाली. 'फायनलमध्ये धडक मारल्याने अगदी सकाळपासून आमचे कौतुक होते आहे; पण आमच्याच क्रिकेट बोर्डाने अद्याप आमच्याशी संपर्क साधला नाही. ही अतिशय निराशाजनक बाब आहे. २०१२मध्ये टी-२० वर्ल्डकप जिंकला; आमचे कौतुक किंवा सत्कार करावा, मान द्यावा असे कुणालाही वाटले नाही', असे नाराज सॅमीने आपल्या सहकाऱ्यांच्या वतीने सांगितले.

**विंडीज बोर्डाचेही प्रत्युत्तर**

सॅमीच्या टीकेवर वेस्ट इंडिज क्रिकेट बोर्डाने (डब्ल्यूआयसीबी) मात्र, खेळाडूंशी चर्चा करून वादावर तोडगा काढण्यास प्रयत्नशील असल्याचे सांगितले. बोर्डाकडून खेळाडूंना कोणताच पाठिंबा व उत्तेजन मिळत नसल्याची टीका सॅमीने टी-२० वर्ल्डकप जिंकल्यावर केली. मात्र त्यांच्या बोर्डाने थेट पत्रक काढून सॅमीची टीका अयोग्य असल्याचे सांगितले.

►► अधिक वृत्त...११

### समालोचकाची माफी

घरचे बोर्ड तसेच स्थानिक पत्रकारांनीही बोल लावल्यावर परदेशी पत्रकार काय आदर करणार? यामुळेच तर इंग्लिश समालोचक मार्क निकोलसने त्यांना 'बिनडोकांचा संघ' म्हणून हिणवले. सॅमी आणि कंपनीने या सगळ्यांना कामगिरीतून उत्तर दिले. हे यश पाहून निकोलसनेही विंडीज संघाची माफी मागितली आहे.